शपथेवर सुरु
सरकारतर्फे साक्षीदार क्र. ४ चा सरतपासः-

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,
माझे नावः - पो.हे.कॉ./१३७९ राहुल बबन यादव,
वयः - ३७ वर्षे,
नेमणुक. - राहुरी पोलिस स्टेशन, जि.अ.नगर.

अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम. के. सोनवणे यांचे मार्फत सुरुः-

दि.१७/०७/२०२१ रोजी मी नेवासा पोलिस स्टेशनला पोलिस नाईक या पदावर कार्यरत होतो. त्या दिवशी गु.र.क्र. ५०३/२०२१ चा तपास माझ्याकडे आला होता. आदेश, फिर्याद, दैनिक अहवाल व तपास आदेश तपासाकामी देण्यात आला होता. आता मला सदरचा तपास आदेश दाखवण्यात आला. तो तोच आहे. त्यावर ठाणे अंमलदार मरकड यांची सही आहे. ते माझे सहकारी असल्याने मी त्यांची सही ओळखतो. त्यातील संपूर्ण मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी ४९ देण्यात येते.

२. कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. सदर घटना ठिकाण हे घोगरगाव गावात महादेव मंदिराजवळ गोदावरी नदी पात्रात होते. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी व दोन पंचाच्या सह्या असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी ५० देण्यात येते.

३. साक्षीदारांचे जबाब नोंदवले. वाहन जप्ती पंचनामा केला. आता मला वाहन जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी व दोन पंचाच्या सह्या असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी ५१ देण्यात येते.

४. वाहनाची मुद्देमाल पावती तयार केली. आता मला सदरची मुद्देमाल पावती दाखवण्यात आली. ती तिच आहे. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी ५२ देण्यात येते.

५. वाहन मुळ मालकाच्या ताब्यात दिले. त्याबाबतचा पंचनामा केला. आता मला सदरचा पंचनामा दाखवण्यात आला. तो तोच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास निशाणी ५३ देण्यात येते. त्यानंतर

६. आता मला जप्त वाहनाचा बॉण्ड दाखविण्यात आला. त्यावर माझी व मुळ मालक यांची सही असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी ५४ देण्यात येते. आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने दोषारोपपत्र दाखल केले. आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर नाही.

सरतपास पुर्ण.

उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ के.बी.शिंदे यांचेमार्फत सुरु-

७. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा मी प्रत्यक्ष जागेवर केलेला नाही. घटनास्थळाच्या बाजुचा गट क्रमांक मला सांगता येणार नाही. घटनास्थळ पंचनामा करतेवेळी पंच अवदुध लोळगे, संतोष गायकवाड व फिर्यादी राहुल साठे उपस्थित होते. हे म्हणणे खरे नाही की, पंच हे झिरो पोलिस म्हणुन पोलिस स्टेशनला कार्य करतात. घटनास्थळाच्या पुर्वेस शेत जमिन आहे, पश्चिमेस महादेव मंदिर, उत्तरेस नदी व दक्षिणेस घोगरगाव कडे जाणारा कच्चा रस्ता आहे. हे मला सांगता येणार नाही की, महादेव मंदिरात गर्दी असते किंवा कसे. हे मला सांगता येणार नाही की, महादेव मंदिर गावचे आराध्यदैवत असल्याने तिथे कायम गर्दी असते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावरील गावातील पंच साक्षीदार घेतला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सरकारी साक्षीदारांव्यतिरीक्त एकही साक्षीदार मी तपासलेला नाही. वाळुचे मोजमाप मी केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, तहसिलदारांच्या आदेशावरून मी खोटी केस दाखल केली. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद एक दिवस उशिराने दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी गेलो नाही, तपास केला नाही केवळ वरिष्ठांच्या सांगण्यावरून खोटा जबाब दिला. हे म्हणणे खरे नाही की, एकही साक्षीदार प्रत्यक्षदर्शी नाही. हे म्हणणे खरे नाही की, तहसिलदार हे आमचे वरिष्ठ अधिकारी आहे. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या आदेशावरून मी खोटी केस दाखल केली.

उलटतपास पुर्ण.फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/-
(ए.एन.सरक)
दिनांक १७/०१/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,
नेवासा.